**मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४**

संदर्भ क्र.: एमएमसीसी/ शिष्यवृत्ती व फ्रीशिप/२०२०-२०२१/ 964 ... २८ डिसेंबर, २०२०

**नोटीस**

# ११ वी व १२ वी MCVC च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप व फ्रीशिप सन २०२०-२०२१ करीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे बाबत

११ वी व १२ वी MCVC च्या मागासवर्गीय विद्यर्थ्यांना सूचित करण्यात येते कि, जे विद्यार्थी **अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव** संवर्गातील असून, शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप साठी पात्र आहेत. अश्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने http://www.mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर अर्ज भरावयाचा आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे. नवीन तयार केला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी.

ऑनलाईन अर्ज भरत असताना Current Course मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव **Marathwada Mitra Mandal's Junior Vocational Wing (2765211369)** असे निवडावे व प्रोफाइल १००% झाल्यावर संवर्ग व उत्पन्नावर आधारित स्कॉलरशिप अथवा फ्रीशिप लागू करावी. **व फी भरल्याबाबतच्या रकान्यात ०.०० (शून्य रुपये) असे नमुद करावे.**

शिष्यवृत्ती (Scholarship) साठी उत्पन्न मर्यादा **व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव करीता रु. १,००,०००/-** असून **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी रु. २,५०,०००/-** इतकी आहे. तसेच फ्रीशिप (Freeship) अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती साठी उत्पन्न मर्यादा नसून **व्हीजेएनटी/विमाप्र/इमावसाठी ची उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/-** इतकी आहे.

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | ऑनलाईन भरलेल्या अर्जाची साक्षांकित प्रत |
| २. | १० वी, ११ वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| ३. | मागील शैक्षणिक वर्ष (शून्य रुपये) ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| ४. | १० वी चा शाळा सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) |
| ५. | डोमेसाइल सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ६. | कास्ट सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ७. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०१९-२०२० चा तहसीलदारचा दाखला ( उत्पन्न मर्यादा वर नमूद केल्याप्रमाणे)(Original) |
| ८. | आधार कार्ड (झेरॉक्स) |
| ९. | राशन कार्ड (झेरॉक्स) |
| १०. | बँक पासबुक (झेरॉक्स) |
| ११. | फी भरल्याची पावती (झेरॉक्स) अथवा महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट |
| १२. | चालू वर्षाकरीता पालकांचे अपत्यांबाबतचे स्वयं घोषित प्रमाणपत्र (Original) |

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच ऐकावेळेला एकच शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्याला घेता येईल.

अर्ज भरताना कुठलीही अडचण येत असल्यास महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागास संपर्क साधावा.

वरील अर्ज अचूक भरून वरील कागदपत्रांसोबत (नमूद केलेल्या क्रमानुसार) व भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासोबत महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात जमा करावा अथवा अर्जाची प्रत इतर सर्व आवश्यक कागदपत्रांसोबत एकत्रित एकाच PDF मध्ये scholarship@mmcc.edu.in या ईमेल वर पाठवावी.

जो पर्यंत महाविद्यालयास स्कॉलरशिप अर्ज व इतर कागदपत्रे हि ईमेल द्वारे अथवा व्यक्तिशः जमा केले जात नाही तो पर्यंत महाविद्यालयाकडून Online Portal वर अर्जाची छाननी केली जाणार नाही. तसेच अद्याप MAHADBT पोर्टल वर अर्ज भरण्याची अंतिम तारीख महाविद्यालयास प्राप्त झालेली नसून, ती प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल व त्यानुसार मुदतीत भरलेल्या प्राप्त अर्जांवरच महाविद्यालय स्तरावरून कार्यवाही केली जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्राचार्य**

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

प्रत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी

Scanned with CamScanner